International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.5 No.1 Sept- Oct 2017

# स्वातंत्र्योत्तर काळातील कोल्हापूर जिल्ह्यातील दलित सामाजिक कार्यकर्ते

**श्री. गौतम हरी आळतेकर**
**सहयोगी प्राध्यापक, श्री शिव–शाहू महाविद्यालय,**
**सरूड, ता.शाहूवाडी, जि. कोल्हापूर.**

पहिल्या फळीतील दलित नेत्यांनी छ. शाहू महाराजांच्या व छ. राजाराम महाराजांच्या प्रेरणेने कोल्हापूर व महाराष्ट्राबरोबरच भारतातील दलितांना आपल्या चळवळींच्या माध्यमातून जागृत केले. कोल्हापूर संस्थानामध्ये जो दलित समाज पिढ्यान—पिढ्या गलितगात्र होऊन बसला होता त्या समाजाला या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी आपले हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. अर्थातच त्याचे संपूर्ण श्रेय हे राजर्षी शाहू महाराजांना व छ. राजाराम महाराजांना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाते. भारताच्या स्वातंत्र्यानंतर डॉ. आंबेडकराच्या नेतृत्वाखाली दलित नेत्यांची दुसरी फळी जी शे. का. फे. मध्ये काम करीत होती ती दलितांना सामाजिक व राजकीय हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी तयार झाली.

**१. प्रा. प्रज्ञावंत गौतम :**

प्रा. प्रज्ञावंत गौतमसरांचा जन्म भारतीय दलित चळवळीचे केंद्र व भारतातील दलितांचे शक्तीस्थळ मु. पो. माणगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे एका शेतमजूराच्या घरामध्ये इ. स. १९४१ मध्ये झाला. वडील आबाजी सुबराव गवळी शेतमजूर असले तरी ते आंबेडकरी विचाराचे होते व इ. स. १९२० माणगाव परिषदेचे ते एक आयोजक होते. या माणगाव परिषदेने पुढे भारताला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने एक महामानव दिला. आबाजी सुबराव गवळी यांचे कुटुंब मोठे असल्यामुळे मुलांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी सरांची आई आकुबाई गवळी यांच्यावर पडली होती. आकुबाई गवळी या शिक्षित होत्या. त्यामुळे त्यांनी पोटाला चिमटा मारून आपल्या मुलांना शिकवले व पुढे उच्चशिक्षित केले. प्रसंगी या सर्व कुटुंबाची काही वेळा उपासमारी ही झाली असली तरी या माऊलीच्यासमोर डॉ. आंबेडकरांचा आदर्श असल्यामुळे या माऊलीने आपल्या मुलांना रोजगाराला न पाठवता शाळेला पाठवले.

इ. स. १९४० ला जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोल्हापूरला आले होते. तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी माणगावातून बरीच मंडळी तावडे हॉटेलजवळ उभी होती. येथे आपल्या आईबरोबर लहान प्रज्ञावंत होते. त्यावेळी बाबासाहेब गाडीतून उतरून माणगावच्या मंडळींचासत्कार स्वीकारला व लहान प्रज्ञावंताची विचारपूस केली व अंगावरून हात फिरवला हा डॉ. बाबासाहेबांचा प्रज्ञावंताना झालेला स्पर्श पुढे प्रज्ञावंताचे जीवन उजळून निघायला कारणीभूत ठरला.

कोल्हापूर संस्थान व पुढे कोल्हापूर जिल्हा हा जरी शाहू महाराजांचा जिल्हा असला तरी या जिल्ह्याला सुद्धा जातीभेदाने ग्रासले होते. येथे सुद्धा दलितांना पाण्याचा हक्क नाकारला होता. त्या काळामध्ये दलितांना उन्हाळ्यामध्ये पाण्यासाठी वणवण भटकावे लागत होते व गाव जातीयवादी असल्यामुळे गावतलावावर दलितांना पाणी भरण्यास मनाई होती. प्रज्ञांवत गौतमसरांनी विद्यार्थी असतानाच इ. स. १९५५ ला बंडखोरी करून गावच्या तळ्यात

पाणी भरले व माणगावच्या तळ्यामध्ये सर्व दलितांना पाणी भरण्याचा हक्क व अधिकार मिळवून दिला. यानंतर आजूबाजूच्या गावातील तरूणांनीही आपापल्या गावामध्ये असेच अनुकरण केले व खऱ्या अर्थाने फुले—शाहू—आंबेडकर विचार स्थापन करण्याचा प्रयत्न केला.

विद्यार्थी दशेपासूनच प्रज्ञावंत दलित, पिडित व सवर्णांच्या मुलांसाठी सुद्धा आंदोलने करून त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करत होते. ते कोल्हापूरात शिक्षणाला आल्यापासूनच १९५८ मध्ये विद्यार्थी चळवळीमध्ये सामील झाले. कारण बोर्डिंग मधल्या विद्यार्थ्यांना जेवण चांगले मिळत नव्हते. पुढे अखिल भारतीय दलित विद्यार्थी परिषदेची स्थापना करून विद्यार्थीदशेपासूनच न्यायासाठी संघर्षाला सुरवात केली. त्यांनी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून विद्यापीठ पातळीपर्यंत विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याच्या प्रयत्न केला. यामध्ये फक्त दलित विद्यार्थ्यांचेच प्रश्न नव्हते तर सवर्ण विद्यार्थ्यांच्या सुद्धा समस्या सोडविण्यासाठी त्यांनी अनेक वेळा विद्यापीठावर मोर्चे सुद्धा काढले.

त्यावेळी दलित विद्यार्थ्यांचा स्कॉलरशीलपचा प्रश्न फार बिकट बनला होता. तो त्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून मार्गस्थ लावून प्रत्येक महिन्याला कॉलेजमार्फत दलित विद्यार्थ्यांना स्कॉलरशील देणे भाग पाडले. पुढे सरकारी नोकरी करत करत चळवळीतील पिंड असल्यामुळे नामांतर चळवळीत भाग घेवून लाँगमार्चमध्ये सामिल झाले. या लाँग मार्च मधील सर्व दलित पँथरच्या कार्यकर्त्यांना अटक झाली. यामध्ये कोल्हापूर विभागातून येथील प्रज्ञावंत सुद्धा होते. त्यांनाही अटक झाली व अहमदनगरच्या विसापूर जेलमध्ये दहा दिवसांची शिक्षा झाली. पुढे १९८० च्या हुपरी दंगल प्रकरणी काढलेल्या मोर्चाचे नेतृत्व सरांच्याकडे होते. यावेळी मोर्चा काढला म्हणून त्यांना दोन दिवस अटक झाली होती. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वच अन्याय, अत्याचाराच्या घटनेच्या विरोधी जेव्हा जेव्हा मोर्चे, आंदोलने, धरणे झाली तेव्हा तेव्हा नेतृत्त्व कोणाचेही असेल सरांचा सहभाग हा असायचाच.

राजकारणाच्याबाबत प्रज्ञावंत सर आरपीआयच्या गटा—तटांच्या राजकारणावर नाराज आहेत. जर डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न साकार करावयाचे असेल, सर्व बहुजन समाजाला घेवून सत्ता हस्तगत करावयाची असेल व दलितांना सत्तेमध्ये भागीदारी मिळवून द्यायची असेल म्हणजेच दलित जमात सत्ताधारी जमात बनायची असेल तर त्यासाठी एकच मार्ग सर सांगतात तो म्हणजे मा. काशीराम यांचा मार्ग. 'जातीपाती तोडो समाज जोडो' व सत्ता हस्तगत करो हा काशिरामजींचा मार्गच डॉ. बाबासाहेबांचे राजकीय स्वप्न पूर्ण करू शकतो हा विचार सरांना पटतो. त्यामुळे सरांनी १९९० नंतर बीएसपीचे काम सुरू केले. त्यांनी जिल्ह्याचे नेतृत्व करून हा पक्ष तमाम बहुजनापर्यंत घेवून जाण्याचा प्रयत्न केला. आज समाजात जी दरी निर्माण झाली आहे. ती जर कमी करावयाची असेल आणि आंबेडकरी समाजाला शासनकर्ती जमात बनवायची असेल तर बीएसपीशिवाय पर्याय नाही असे सरांचे मत आहे.

सरांनी कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांना विद्यार्थी दशेपासूनच आंदोलने करुन न्याय देण्याचा प्रयत्न केला होता. या त्यांच्या सामाजिक व राजकीय चळवळीमुळे त्यांना अनेक सत्कार व पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप पुरस्कार दलित साहित्य ॲकेडमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरी जनआंदोलन तर्फे मानपत्र, कोल्हापूर, जनशक्ती पक्ष—शाखा कोल्हापूर तर्फे मानपत्र इ. चा समावेश होतो.

सर आज ७० वर्षांचे आहेत व ते आजसुद्धा आंबेडकरी समाजासाठी २४ तास उपलब्ध आहेत. आजही कोल्हापूर जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय दलित कार्यकर्ते नेते, अभ्यासक,सरांचे मार्गदर्शन घेतात व सर सुद्धा त्यांच्यासाठी सदैव तयार असतात. जिल्ह्याच्या सामाजिक व राजकीय बदलाबाबत प्रा. प्रज्ञावंत समाधानी आहे.

**२. दत्ता जाधव :**

कोल्हापूर जिल्ह्यातील एक अग्रगण्य नेतृत्व, कवी, लेखक व फरडा वक्ता म्हणजे दत्ता जाधव होय. दत्ता जाधव यांचे पूर्णनाव दत्ता बाबू जाधव असे असून त्यांच जन्म मु. पो. यवलूज, ता. पन्हाळा या गावी एका गरीब दलित कुटुंबात इ. स. १९४९ ला झाला. दत्ता जाधवांचे वडील लहानपणीच वारल्यामुळे त्यांच्या व कुटुंबाच्या पालन पोषणाची सर्व जबाबदारी ही त्यांच्या आईवर पडली. घरी आठराविश्व दारिद्र्य असताना या माऊलीने आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतामध्ये मोलमजुरी करून केला. पुढे दत्ता जाधव हे १९६७ ला कोल्हापूरला शाळेसाठी आहे. दत्ता जाधवांना या काळामध्ये पेपर वाचायची फार आवड होती. यामधूनच ते प्रथम समाजवादी विचारसरणीकडे ओढले जाऊन ते माधवराव बागल, दलित मित्र बापूसाहेब पाटील, रवींद्र सबनीस, पन्नालाल सुराणा अशा नेत्यांच्या सहवासात आले व या नेत्यांच्यामुळे ते चळवळीकडे आकर्षित झाले.

१९७० साली दत्ता जाधव हे मिस क्लार्क बोर्डिंगमध्ये रहात होते. यावेळी करवीर तालुक्यातील आमशी या गावात सवर्णांनी दलितांवर अन्याय, अत्याचार केला होता. ही घटना दत्ता जाधवांच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट ठरली व आमशीच्या संघर्षात त्यांनी उडी घेऊन आपल्या दलित चळवळीला सुरवात केली. या आमशीच्या आंदोलनामध्ये त्यांच्याबरोबर वरील सर्व समाजवादी पुढारी होते हे लक्षात घेतले पाहिजे. आमशीच्या आंदोलनाने दत्ता जाधव या दलित नेतृत्वाचा कोल्हापूरच्या दलित चळवळीमध्ये एक अग्रगण्य नेता म्हणून उदय झाला.

ज्यावेळी दत्ता जाधव हे मिस क्लार्क बोर्डिंगमध्ये रहात होते त्या १९७० च्या दशकामध्ये महाराष्ट्रभर दलितांच्यावर सवर्णांकडून अन्याय व अत्याचार सुरू होते. दलित स्त्रीयांची अब्रु लुटली जात होती. तर काही ठिकाणी तिला विवस्त्र करून तिची धिंड काढली जात होती. या अन्याय, अत्याचारामुळे तमाम दलित तरूण पेटून उठला होता. या मध्ये दलित कवी, साहित्यिक व लेखक होते. या सर्वांनी मिळून सवर्णांच्या अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी १९७२ ला एक दलित तरूणांची संघटना स्थापन केली. ती संघटना म्हणजे दलित पँथर होय. राजा ढाले हे पँथरचे अध्यक्ष होते. राजा ढालेंच्या नेतृत्वामध्ये पँथर आता महाराष्ट्रामध्ये जेथे जेथे दलितांच्यावर अन्याय व अत्याचार होत होते तेथे याचा प्रतिकार करण्यासाठी तुटून पडू लागले. अशा प्रकारे पँथर आता अन्याय व अत्याचारा विरोधी आग ओकू लागली. राजा ढालेंवर महाराष्ट्रभर खटले दाखल झाले. पण पँथरने याला भीक घातली नाही. ते आपले काम करतच राहिले. यावेळी राजा ढालेंच्या नेतृत्वामध्ये नामदेव ढसाळ, ज. वी. पवार पुढे प्रा. अरुण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे, दत्ता जाधव, अविनाश महातेकर, प्रीतम शेगांवकर सामील झाले.

अशा प्रकारे दलित पँथर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दलितांच्या वरील अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार करू लागली. कोल्हापूर जिल्हा जरी शाहू राजांचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध असला तरी याही जिल्ह्यामध्ये या काळात हळूहळू जातीयवादी प्रवृत्तीने उचल खाली व जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी दलितांच्यावर अन्याय व अत्याचार होवू लागले. दलित पँथर संघटनेचा आता महाराष्ट्रभर बराच गवगवा झाला होता. कोल्हापूरच्या दलित तरुणांची सुद्धा आता सवर्णांना प्रतिकार करण्याची भाषा येवू लागली. यातूनच कोल्हापूरच्या दलित तरुणांची एक मिटिंग हुतात्मा पार्कमध्ये घेवून कोल्हापूरला दलित पँथरच्या शाखेची स्थापना करण्याचा निर्णय झाला. दत्ता जाधव यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. या मिटिंगला बाबुराव परितेकर, आर. बी. कोसांबी सर, शंकरराव आवळे इत्यादी मंडळी हजर होती. यावेळी राजा ढालेंच्या कोल्हापूरला सभा आयोजित करण्याचा निर्णय झाला.

ठरल्याप्रमाणे कोल्हापूरमध्ये राजारामपुरी मातंग वसाहत, सदर बझार, सिद्धार्थनगर व बिंदू चौक अशा चार ठिकाणी सभा झाल्या. यामुळे साऱ्या जिल्हाभर दलित पँथरचा

झंझावात सुरू झाला. कोल्हापूर जिल्ह्यातील सारा दलित तरूण पँथरकडे आकर्षित झाला. कारण सर्वांनाच कमी जास्त प्रमाणात जातीयवादाची झळ बसत होती. आता संपूर्ण जिल्हा आपला संरक्षक म्हणून पँथरकडे पाहू लागला. पँथरसुद्धा कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांच्यावर होणाऱ्या अत्याचाराविरोधी वेळोवेळी रस्त्यावर येऊन सरकारचे या प्रश्नांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करु लागले. यामध्ये बेलवळे, जैताळ, हुपरी, घोटवडे, कुडित्रे इ. गावातील दलित अत्याचाराविरोधी आंदोलनाच्या घटना असतील. या सर्व अत्याचार व अन्यायाविरोधी मोर्चेकाढून, धरणे धरून उपोषणे करून प्रशासनाचे लक्ष वेधले व या गावातील दलितांना न्याय मिळवून दिला. कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांना न्याय मिळवून देत असताना दत्ता जाधवांना अनेक वेळा अटक होवून दहा दहा दिवस तुरूंगात रहावे लागले आहे. हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

अशापद्धतीने कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दत्ता जाधवांच्या नेतृत्वाखाली पँथर काम करत असताना व पँथरला महाराष्ट्रभर यश येत असताना नेत्यांच्या अहंकारांमूळे राजा ढालेंनी पँथरच्या बरखास्तीतीची घोषणा केली. राजा ढाल्यांनी आता मासमुव्हमेंट या नव्या संघटनेची स्थापना केली. तर नामदेव ढसाळांनी दलित पँथर आहे तशीच पुढे सुरू ठेवली. राजा ढाले व नामदेव ढसाळ यांच्या शिवाय इतर जे नेते होते ते औरंगाबादला एकत्र आले. यामध्ये रामदास आठवले, ज. वि.पवार, प्रा. अरूण कांबळे व दत्ता जाधव यांचा समावेश होता. या गटाने भारतीय दलित पँथर या नवीन संघटनेची स्थापना करून नामांतराची घोषणा केली. मराठवाड्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य मोठे होते. त्यामुळे मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव द्यावे अशी मागणी या मिटिंगमध्ये कोल्हापूरच्या दत्ता जाधवांनी केली. सुरवातीला तु तू मै मै होवून ही मागणी सर्वांनी उचलून धरली व विधीमंडळामध्ये तशी मागणी केली. यानंतरच नामांतराचा प्रश्न साऱ्या महाराष्ट्रभर गाजला. अनेक दलित कार्यकर्त्यांना यामध्ये आपले प्राण गमवावे लागले. कोल्हापूरमध्ये सुद्धा दत्ता जाधव, आर. बी. कोसांबी सर, बाबासाहेब वडगावकर, प्रकाश हुलस्वार, प्रज्ञावंत गौतम इ. नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी मोर्चे, उपोषणे, धरणे व सभा घेऊन हा प्रश्न सतत जिवंत ठेवला. अखेर शरद पवारांनी तेरा वर्षांनी इ. स. १९९४ ला हा प्रश्न निकालात काढला व मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देवून डॉ. आंबेडकरांचा योग्य तो सन्मान केला.

नामांतर प्रश्नांवर व रिडलस् प्रश्नावर कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दत्ता जाधवांच्या नेतृत्वाखाली मोठा संघर्ष झाला होता. आज कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दलित चळवळीतील तिसरी पिढी राजकीय व सामाजिक पातळीवर काम करत आहे. या पिढीतील सर्वच नेते व कार्यकर्ते दत्ता जाधवांचे मार्गदर्शन घवूनच पुढे पाऊल टाकतात. अर्थातच त्यांना समाजाकडून हा एक मोठा मान मिळत आहे. असे असले तरी त्यांनी सुरवातीपासूनच दलित चळवळीमध्ये काम करत असताना कोणताच स्वार्थ आपल्या पुढे ठेवला नव्हता. हा एकमेव नेता असा आहे की त्यांनी कधी मानसन्मानासाठी काम केले नाही. ज्या ध्येयाने व कर्तव्याने वंचित, दलित समाजासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काम केले तसेच काम, तोच आदर्श आयुष्यभर समोर ठेवून काम करणारे कोल्हापूरच्या दलित चळवळीतील एक अग्रगण्य नेतृत्व म्हणजे दत्ता जाधव होय.

**३. राजवर्धन बाळासो कोसंबी ऊर्फ आर. बी. सर :**

आर. बी. सरांचा जन्म मु. पो. कोते, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथे इ. स. १९५५ ला शेतमजुराच्या घरी झाला. आर. बी. सरांचे वडील शेतमजुरी करत होते. हे जीवन माझ्या मुला—बाळांच्या वाट्याला येऊ नये म्हणून त्यांनी स्वतःच्या पोटाला चिमटा देवून आपल्या मुलांना शिकविले. या कामी त्यांच्या पत्नीने त्यांना चांगली साथ दिली. पुढे आर. बी. सर कोल्हापूरला शिक्षणासाठी आले. कोल्हापूरमध्ये शिकत असताना १९७० च्या दरम्यान जिल्ह्यामध्ये जो दलित समाजावर सवर्णाकडून अन्याय व अत्याचार होत होता तसेच दलित विद्यार्थ्यांना सुद्धा शाळा—कॉलेजमध्ये पिळवणूक होत होती हे सर्व आर. बी. सर स्वतःच्या डोळ्यांनी पहात होते व अनुभवत सुद्धा होते. यावेळी त्यांच्यातील समाज सेवक, कार्यकर्ता जागा झाला. यावेळी कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आंबेडकरी चळवळीतील पहिल्या पिढीतील नेते व कार्यकर्ते काम करत होते. पण हे सर्वजण आक्रमणामध्ये कमी पडत होते.

अशा परिस्थितीमध्ये इ. स. १९७० ला कोल्हापूरमध्ये अखिल भारतीय दलित विद्यार्थी संघटना स्थापन होऊन प्रज्ञावंत गौतम व एस. डी. द्रविड यांच्या मार्गदर्शनाखाली आर. बी. सरांनी विद्यार्थी चळवळीला सुरवात केली. दलित विद्यार्थी संघटनेमध्ये काम करत असताना त्यांनी अनेक आंदोलने केली. यामध्ये महागाईच्या निर्देशांकाप्रमाणे स्कॉलरशीपमध्ये वाढ होऊन ती वेळेत मिळावी, म्हणून कोल्हापूरमध्ये आलेले शिक्षणमंत्री मा. मधुकरराव चौधरी यांची गाडी अडवून त्यांना विद्यार्थ्यांच्या मागणीचे निवेदन दिले. तसेच याच प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी अनुसुचित जातीचे कमिशनर खा. शंकराव माने यांच्या घरावर विद्यार्थी संघटनेचा मोर्चा काढून त्यांना निवेदन सादर केले.

अशापद्धतीने विद्यार्थीदशेमध्येच आंदोलन करत करत आर. बी. सर बी. ए. झाले व सरकारी नोकरी न करण्याची शपथ घेऊन समाजासाठी दलित चळवळीमध्ये ते पूर्णवेळ काम करू लागले. भारतीय राज्यघटनेने दिलेल्या सवलीचा फायदा दलित तरूण—तरूणी घेत होते. शिक्षण शिकत होते व नोकऱ्या मिळवून आपली व समाजाची प्रगती करत होते. समाजामध्ये बदल घडविण्याचा प्रयत्न करत होते. हेच नेमके आता कोल्हापूर जिल्ह्यातील सवर्ण समाजातील काही समाज कंटकांना बघवत नव्हते. तसेच आता कोल्हापूरचा दलित जागृत होत होता व आपल्या हक्कांसाठी व अधिकारासाठी संघर्षाची भाषा बोलत होता. यातूनच तो पिण्याच्या पाण्याची व मंदिर प्रवेशाची भाषा बोलत होता व गावोगावी आंदोलने करीत होता .याला उत्तर म्हणून कोल्हापूर जिल्ह्यातील काही गावामध्ये सवर्ण मंडळीकडून दलितांवर अन्याय, अत्याचार सुरू झाले व दलित समाजावर बहिष्काराचे अस्त्र सवर्ण समाजाकडून वापरले गले. अर्थात यामध्ये सर्व सवर्ण समाज सामील होता असे नव्हे. पण काहींना आपल्या मनाच्या इच्छेच्या विरोधी काही समाजकंटकांना भिऊन यामध्ये सामील व्हावे लागत होते. अशा परिस्थितीमध्ये शाहू महाराजांच्या कोल्हापूरची दलित जनता आपले जिवन जगत होती. नक्कीच हे आता शिकलेल्या व आंबेडकरी विचारांच्या दलित तरूणांना सहन होत नव्हते. ते राज्यपातळीवरील दलित तरूण नेत्यांच्या सतत संपर्कात होते. तसेच दलित कवी यांच्या कवीता वाचत होते आणि दलित साहित्यिकांची पुस्तके सुद्धा वाचत होते. या बरोबरच भाषणे सुद्धा एकत होते. यामुळे कोल्हापूरचे दलित तरूण आता जास्तच अन्यायाच्या विरोधी पेटून उठत होते.

अशाच परिस्थितीमध्ये इ. स. १९७२ ला राज्यपातळीवर अनेक दलित तरूण साहित्यिक कवी एकत्र येऊन, त्यांनी 'दलित पँथर' या संघटनेची स्थापना केली. यामध्ये राजा ढाले, ज. वी. पवार, नामदेव ढसाळ इत्यादी दलित नेते, कवी व साहित्यिक होते. दलित पँथर ही लढाऊ संघटना असल्यामुळे कोल्हापूरातील दलित तरूणांनी इ. स. १९७३ ला या संघटनेची कोल्हापूरमध्ये शाखा स्थापन केली. आता. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये जेथे जेथे

दलितांवर अन्याय व अत्याचार होवू लागले तेथे तेथे कोल्हापूरची दलित पँथर अन्याय करणाऱ्या समाज कंटकावर तुटून पडू लागले. मोर्चे, धरणे, उपोषणे, इ. आंदोलनाच्या माध्यमातून ते दलितांच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधू लागले व आपल्या दलित बांधवांना संरक्षण देवू लागले. अर्थातच यामध्ये आर. बी. सर सर्वांच्या पुढे होते. १९७३ पासून ते आतापर्यंत आर. बी. सर फक्त आणि फक्त दलित समाजासाठी लढत राहिले. यासाठी त्यांनी समाजाकडून कोणतीही अपेक्षा ठेवली नाही.

लग्न झाल्यानंतर आर. बी. सरांनी कुटुंबाचा चरितार्थ चालवा म्हणून मिस क्लार्क होस्टेलमध्ये खाजगी नोकरी पत्करली. यामुळे इ. स. १९७६ ते १९९० पर्यंत शाहू महाराजांनी स्थापन केलेले मिस क्लार्क बोर्डिंग हे जिल्ह्याच्या दलित चळवळीचे केंद्र बनले. याकाळामध्ये जिल्ह्यात कोठेही दलितांवर अन्याय, अत्याचार झाला तर आपलेपणाने दलित मंडळी वेळेचे भान न ठेवता आर. बी. सरांच्या आश्रयाला येत होते. आर. बी. सर प्रथम त्यांना भाजी—भाकरी देवून शांत करत होते. मग त्यांच्याशी चर्चा करून निवेदन तयार करायचे व आलेल्या शिष्टमंडळाला घेवून सर कलेक्टर व पोलिस प्रमुखांना भेटून जेथे अन्याय व अत्याचार झाला आहे तेथील दलितांना प्रथम संरक्षण द्यावेत आणि नंतर समाजकंटकांनी अटक करावी अशी विनंती या अधिकाऱ्यांच्याकडे करायचे. त्यामुळे आर. बी. सर म्हणजे जिल्ह्यातील दलितांना एक आधारवड वाटू लागले.

अशा या कोल्हापूरच्या आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य नेतृत्व, तळपता सूर्य आर. बी. सरांची जिल्हा, राज्य व दिल्लीतील आंदोलने पुढील प्रमाणे सांगता येतील,

***७० चे दशक:*** १. शिरोली पुलाची, ता. हातकणंगले पाणी प्रश्न. मेलेले जनावरे पिण्याच्या पाण्याचा तलावात टाकले होते त्या विरूद्ध आंदोलन, १९७३, २. आळवे, ता. पन्हाळा पाणी आंदोलन, १९७३, ३. वरळी दंगल मुंबई मोर्चा १९७४, ४. गिरोली, ता. पन्हाळा पाणी आंदोलन, १९७५, ५. कोते, ता. राधानगरी, पाणी व गावकीच्या कामासाठी आंदोलन, १९७६, ६. बेलवले बुद्रुक, ता. कागल, पिण्याचे पाणी व मंदिर प्रवेश आंदोलन, १९७६, ७. मळगे, ता. कागल, पिण्याच्या पाण्यासाठी आंदोलन, १९७६, ८. वडगाव, ता. हातकणंगले, पिण्याच्या पाण्यासाठी आंदोलन, १९७६, ९. वरळी दंगल, दिल्ली मोर्चा, १९७७, १०. बेळगुंडी, ता. गडहिंग्लज, पाणी आंदोलन, १९७७ ११. बेळवळे, ता. कागल, सत्याग्रह १९७७, ११. जैताळ, ता. करवीर, पाणी प्रश्न आंदोलन, १९७८—१९८४, १२. लाँग मार्च ६ डिसेंबर १९७९

***८० चे दशक:*** १३. गोकुळ शिरगाव, ता. कागल, पाणी आंदोलन, १९८०, १४. साके, ता. कागल, पाणी आंदोलन, १९८०, १५. तामगाव, ता. करवीर, पाणी आंदोलन, १९८०, १६. निठोरी, ता. कागल, पाणी आंदोलन, १९८०, १७. डी. आय. जी. ऑफिस दलित अत्याचार विरोधी सर्व पक्षीय व आर. पी. आय. मोर्चा, १९८०, १८. मादळे, ता. पन्हाळा, पाणी आंदोलन, १९८१, १९. नागाव, ता. हातकणंगले, पाणी आंदोलन, १९८२, २०. कोदवडे, ता. पन्हाळा, पाणी आंदोलन, १९८२, २१. एकोंडी, ता. कागल, पाणी प्रश्न, १९८२, २२. जैत्याळ, ता. कागल, पाणी प्रश्न १९८३, २३. बेले, ता. करवीर, जयंती मिरवूणक आडवणूक, १९८४, २४. सोनाळी, ता. कागल, पाणी प्रश्न, १९८५, २५. सावर्डे, ता. राधानगरी, पाणी प्रश्न, १९८५, २६. कोल्हापूर, ता. करवीर, अरुण पांडव खून प्रकरण, १९८५, २७. घोटवडे, ता. पन्हाळा, जातीय दंगल, १९८८, २८. मोर्चा मुंबई, १९८८,

***९० चे दशक:*** २९. मुडसिंगी, ता. करवीर, जातीय दंगल, १९९४, ३०. घाटकोपर मुंबई, कोल्हापूर येथे आंदोलन, ११ नोव्हेंबर १९९७, ३१. नापीक आंदोलन कोल्हापूर, मुंबई १९९०,

***२००० नंतर:*** ३२. खेरलांजी प्रकरण, कोल्हापूर येथे आंदोलन, सप्टेंबर २००६

अशाप्रकारे सर्व प्रकारे आर. बी. सरांनी विविध जिल्हा, राज्य व राष्ट्रव्यापी दलित आंदोलनामध्ये नेतृत्व करून दलित बांधवावर त्या त्या वेळी न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. ही आंदोलने करीत असताना प्रथम अखिल भारतीय दलित परिषद नंतर दलित पॅंथर व शेवटी मास मुव्हमेंट या सामाजिक संघटनांच्यामार्फत त्यांनी संघटनांचे नेतृत्व करून आंदोलने, मोर्चे व सत्यागृहे केली.

आज आर. बी. सरांची दोन मुले राज्य व देशपातळीवर उत्कृष्ठ गायक म्हणून नावारूपाला आले आहेत. यापैकी अभिजित कोसंबी हा महाराष्ट्राचा महागायक झाला आहे. तर दुसरा मुलगा प्रशेनजीत कोसंबी हा इंडियन आयडॉलपर्यंत जाऊन आला आहे. तर तिसरा मुलगा हा इंग्रजीमध्ये डॉक्टरेट मिळवून मुंबई येथे प्राध्यापकाचे काम करत आहे. अशाप्रकारे १९७० ते आतापर्यंत आर. बी. सरांनी कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र काम केले आहे. याचबरोबर स्वत:चे कुटुंब ही उच्चशिक्षित केले आहे. या कामी त्यांना त्यांची शिक्षिका असलेल्या पत्नीचे मोलाची साथ दिली आहे. म्हणूनच त्यांना दलित समाजाची सेवा करण्याची जी संधी मिळाली तिचे सोने करून दाखविले. अन्यथा जर मॅडमची साथ मिळाली नसती तर सरांना हे शक्य नव्हते.

सर आज सुद्धा समाजाचे काम करत आहेत. त्यांनी स्वत:ला कुठल्याच पक्षामध्ये गुंतून घेतले नाही व फक्त आणि फक्त आंबेडकरी समाज पक्षाच्या कामात ते बिझी आहेत. अशा या नेत्यास आंदोलन करत असताना अनेक वेळा अटक व जेलमध्ये जायला लागले आहे पण सरांनी समाजासाठी त्याचीही फिकीर केली नाही. कोल्हापूर जिल्ह्यमध्ये एकमेव दलित नेता व कार्यकर्ता म्हणून आरबीसर असे आहेत की कोणताही आंबेडकरी गट—तट असो तो आर. बी. सरांचे नाव आदराने उच्चारतो. यामध्येच त्यांनी सर्व काही मिळविले आहे. अशा आर. बी. सरांना आतापर्यंत अनेक मान—सन्मान मिळालेले आहेत, जसे, अखिल भारतीय धम्म परिषद, मुंबई, राजा ढाले यांच्या हस्ते, १९८६, कोरगावकर ट्रस्ट कोल्हापूर दलित मित्र बापूसाहेब पाटील यांच्या हस्ते १९९०, जिल्हा पोलिस अधिक्षक, सानपसाहेब यांच्या हस्ते सत्कार व मानचिन्ह १९९७, धम्मदिक्षा सुवर्ण महोत्सव, कोल्हापूर, कार्याध्यक्ष, २००६, संयुक्त जयंती, कोल्हापूर, मुख्य प्रयोजक, २०१०, शाहीर विठ्ठल उमाप पुरस्कार, २०१२, विद्रोही साहित्य संमेलन, कोल्हापूर. सिंधूजन पुरस्कार, २०१४ इ.

सरांवर आज बायपास सर्जरी झाली आहे. वय वर्षे ६२ च्या पुढे असताना सुद्धा ते अजूनही दलित सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांच्या सदैव पाठिशी असतात. आर. बी. सरांनी १९७० पासून फक्त आणि फक्त कोल्हापूर जिल्ह्याच्या दलितांच्या सामाजिक बदलासाठी संघर्ष केला. अशा कोल्हापूरच्या सुपूत्राला व माझ्या गुरूला कोटी कोटी प्रणाम व भविष्यासाठी शुभेच्छा!

**४. प्रा. जी. बी. अंबपकर एक हाडाचा शिक्षक व तळमळीचा कार्यकर्ता :**

अंबपकर सरांचा जन्म मु. पो. अंबप, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे झाला. यांच्या आई वडिलांचे नाव बसाप्पा व हिराबाई होते. या जोडप्याला एकूण सात मुले झाली. पैकी सहावे अपत्य म्हणजे सर होय. सरांची परिस्थिती फारच हालाखीची होती. यामध्ये वडीलांची इच्छा होती की गावात कोण शिकलं नाही एवढं शिकायचं बघ. वडिलांच्यासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श होता. त्यामुळे गुलाबकडे त्यांच्या शिक्षणाच्याबाबतीत चांगले लक्ष होते. कारण दुसरी दोन मुले होती ती काही शाळेला जात नव्हती.

१९७२ ला सर शिक्षणाचा एक टप्पा पार करून दुसऱ्या टप्प्यासाठी म्हणजे कॉलेजच्या शिक्षणासाठी वारणा महाविद्यालयामध्ये व तेथेच ते बोर्डिंगमध्येही राहू लागले. पुढे ते या कॉलेजमधून बी. ए. झाले. व पुढील शिक्षणासाठी एम. ए. ला ते शिवाजी विद्यापीठात हजर झाले. सरांना प्राध्यापक व्हायचे होते. येथे चांगल्या मार्कांनी एम. ए. पूर्ण

केल्यानंतर १९७८ ला प्रथम शाहू महाविद्यालय, पुणे, नंतर दांडेकर कॉलेज, पालघर, मध्ये नोकरी केल्यानंतर १९८० ला सर देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स येथे ज्युनिअर प्राध्यापक म्हणून काम करू लागले व येथूनच निवृत्त झाले. आज सरांना दोन मुलगे असून ते उच्च शिक्षित आहे. सुना, नातवंडे तसेच मॅडम या सरांच्या पाठिशी खंबीरपणे उभ्या राहिल्यामुळे नोकरी करत सरांनी उरलेल्या वेळ समाजकार्यासाठी दिला.

सरांनी कोल्हापूर जिल्ह्यातील दलित बांधवांना न्याय मिळवून देवून त्यांच्या जिवनामध्ये चांगला सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केला. कारण अंबपकरसरांच्या समोर डॉ. बाबासाहेबांचा आदर्श होता व ते आपल्या परीने समाजाच्या सुख—दुःखातील खारीचा वाटा उचलत होते. ते शेवटपर्यंत राजा ढालेच्या नेतृत्वाखाली मास मुव्हमेंट सम्यक क्रांती मध्ये कार्य करत होते.

**माणगाव परिषद (१९८२)**: १९८० च्या दरम्यान मराठा महासंघाने राज्यभर कार्यक्रम घेवून जातवार आरक्षण रद्द झाले पाहिजे व आर्थिक निकषांवर आरक्षण मिळाले पाहिजे असा विषय घेऊन सर्व महाराष्ट्र पिंजून काढला होता. यामध्ये आण्णासाहेब पाटील हे नेते म्हणून मराठा मंडळाला दलितांच्या विरोधी पेटवून उठवत होते व ही मराठा मंडळी सर्व राज्यांमध्ये दलितांच्यावर अन्याय व अत्याचार करत सुटली होती. कोल्हापूरमध्येही मराठा महासंघाच्या कार्यक्रम झाले. याला उत्तर देण्यासाठी व १९२० च्या माणगाव परिषदेची एकसष्ठीपूर्ती करावी यासाठी १९८२ ला माणगाव परिषद आयोजित केली होती. यामध्ये त्या काळातील कोल्हापूर जिल्ह्यातील दिग्गज दलित पुढारी, कार्यकर्ते व मंत्रीमंडळी हजर होती. या माणगाव परिषदेच्या कार्यक्रमामध्ये सरांचा तन—मन धनाने सक्रीय सहभाग होता ते कमिटीचे अध्यक्ष होते या परिषदेला रत्नाप्पाअण्णा कुंभार, रा. ना. चव्हाण, राजा ढाले, रा. सु. गवई, प्रा. जोगेंद्र कवाडे व जिल्ह्यातील त्या वेळचे सर्व दलित नेते व कार्यकर्ते हजर होते. या कार्यक्रमाला लाखो दलित महाराष्ट्रामधून हजर होते.

सरांनी दलितांच्या कल्याणासाठी तसेच विस्थापतीसाठी अनेक आंदोलने केली, जशी,

१. जैताळ, ता. करवी, वेठबिगार पद्धती विरोधी आंदोलन, १९७८—१९८४, २. साके, ता. कागल, डॉ. आंबेडकर जयंती प्रकरण, आंदोलन, ३० एप्रिल १९८३, ३. चांदोली, ता. शिराळा धम्म परिषदमध्ये सामील, या धम्म परिषदेला प्रकाश आंबेडकर, प्रा. रमेश ढावरे, प्रा. एम. डी. नलवडे व प्रा. जी. बी. अंबपकर सामील झाले होते, कोल्हापूर शहर डॉ. आंबेडकर पुतळा प्रकरण आंदोलन, १९८६,४. नेज—कुंभोज, ता. हातकणंगले, दलितांचे जमीन प्रकरण, आंदोलन, १९८६, ५. चांदोली धरणगस्त विस्थापितांचा लढा आंदोलन, १९८६, ६. घोटवडे, ता. पन्हाळा, पाणी सत्याग्रह आंदोलन, ७ मार्च १९८८, ७. कुडित्रे, ता. करवीर, धम्म परिषद, सहभाग १९९१, ८. मसाई पठार बौद्ध लेणी आंदोलन, १९९२, ९. सुळकूड, ता. कागल, हेगडे खून प्रकरण आंदोलन १९९३, १०. शिवाजी विद्यापीठ डी. लिट. प्रकरण आंदोलन १९९२—१९९३, ११. वडणगे प्रकरण ता. करवीर, आंदोलन, मे २००५, १२. बिंदू चौक कोल्हापूर आंदोलन २००७,

याशिवाय सर फास्टा संघटनेत १९८१ पासून सक्रीय आहेत तसेच प्रषिक विद्यार्थी संघ स्थापनेत त्यांनी १९८५ पासून सहभाग घेतलेला आहे.

**समारोप :**

अशाप्रकारे प्रा. प्रज्ञावंत गौतम, दत्ता जाधव, आर.बी.कोसंबी आणि प्रा. जी. बी. अंबपकर यांनी आपापल्या नोक—या सांभाळून दिवस व रात्र समाजाची जागृती व सेवा केली. अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी प्रेरित केले व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एकूणच दलितांचा सामाजिक चेहरामोहरा बदलण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला.

**संदर्भसूची :**

१. प्रा. प्रज्ञावंत गौतम, चर्चा वजा मुलाखत दि. ७ फेब्रुवारी २०१६
२. जाधव दत्ता, चर्चा वजा मुलाखत दि. २१ फेब्रुवारी २०१६
३. कोसंबी आर.बी., चर्चा वजा मुलाखत दि. १४ फेब्रुवारी २०१६
४. प्रा. आंबपकर जी.बी. चर्चा वजा मुलाखत दि. २८ फेब्रुवारी २०१६